**शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन व नाविण्यपूर्ण उपक्रम कक्ष स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**

शासन निर्णय क्रमांक: शिप्रयो २२१४/प्र.क्र.५३/२०१४/प्रशिक्षण
मंत्रालय, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २१ नोव्हेंबर, २०१४.

**संदर्भ:-** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक क्र.शैगुवि-२०१४/(८१/१४)/एसडी-६ दिनांक २४ जुलै,२०१४.

**प्रस्तावना:**

राज्यातील शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी शासनाने शिक्षकांचे प्रशिक्षण व विविध दर्जेदार योजनांची अंमलबजावणी यावर विशेष भर दिला असून विभागाचे नवीन प्रशिक्षण धोरण दिनांक २९ जानेवारी,२०१४ अन्वये जाहीर करण्यात आले .शिक्षणाची गुणवत्ता वाढ होण्यासाठी व शिक्षण क्षेत्रातील विविध अडचणीवर मात करण्यासाठी उद्योग क्षेत्राचे (CSR) सहाय्य मिळविण्याबाबत शासन प्रयत्नशिल आहे. शिक्षण हक्क कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच, शाळांमधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी व शैक्षणिक गुणवत्तेचे सार्वत्रिकरण करण्यासाठी शासन प्रयत्नशिल आहे. त्यासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणावर विशेष भर देण्यात येत असून, विविध नामांकित संस्थांसोबत करार ( MOU ) करण्यात आले आहेत. (उदा: आयआयटी, मुंबई, ब्रिटीश कौन्सील, अगस्त्या फाऊंडेशन, आयआयएम अहमदाबाद ) प्रशिक्षणाद्वारे शिक्षकांपर्यन्त पोहचविण्यात येणारी माहिती, ज्ञान यांचा उपयोग प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना होतो आहे किंवा कसे हे तपासून वेळीच त्यावर उपाय योजना करणे आवश्यक आहे. तसेच दैनंदिन शिक्षण पध्दतीत सतत नाविण्यपूर्ण प्रयोग व उपक्रमशिलता आणणे गरजेचे असल्याने शाळास्तरापर्यंत शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा नियंत्रण करण्यासाठी विद्या परिषद,पुणे व सर्व डाएट संस्थेसह विभागाच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयात शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन व नाविण्यपूर्ण उपक्रम कक्ष स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:**

आयुक्त शिक्षण यांचे पत्र क्रमांक आशि/शै.गुणवत्ताकक्ष/२०१४/आस्था-ब(१२२)/५४३ दिनांक ०१/०९/२०१४ च्या पत्रान्वये स्थापन करण्यात आलेला गुणवत्ता कक्ष यापुढे **“शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन व नाविण्यपूर्ण उपक्रम कक्ष ”** या नावाने कार्यरत राहील व त्याची संरचना पुढील प्रमाणे राहील:-

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे | अध्यक्ष |
| २ | शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे | सदस्य |
| ३ | संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे | सदस्य |
| ४ | शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ), पुणे | सदस्य |
| ६ | शिक्षण सहसंचालक (प्राथमिक) | सदस्य |
| ७ | शिक्षण सहसंचालक ( प्रशासन, अंदाज व नियोजन) | सदस्य |
| ८ | शिक्षण सहसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) | सदस्य |
| ९ | डॉ. वसंत काळपांडे, शिक्षण तज्ञ, पुणे | निमंत्रित |
| १० | सहसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे | सदस्य सचिव |

सदर समितीची कार्यकक्षा व भूमिका

१. राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक असणारे सर्व उपायोजना करणे.
२. विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची (उदा: चावडी वाचन,अभ्यास जत्रा, शिक्षणोत्सव, शिक्षकांचे प्रशिक्षण सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापन, शाळाबाहय बालकांसाठी विशेष प्रशिक्षण, गट/शहर साधन केंद्रांचा शैक्षणिक साहयासाठी उपयोग, ग्रंथालयाचा वापर , अध्ययन समृध्दी कार्यक्रमाअंतर्गत उपलब्ध शैक्षणिक साहित्य व कोपरे, मोफत पाठयपुस्तके, इत्यादी) गुणवत्ता पातळी राखण्यासाठी मार्गदर्शन करणे.
३. योजनानिहाय गुणवत्तेचे निकष निश्चित करणे.
४. शैक्षणिक गुणवत्तेचे महत्व आवश्यकता शिक्षकांपर्यंत पोहचवण्यासाठी पर्यवेक्षकीय यंत्रणेचे सातत्याने आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.
५. राज्यात विविध ठिकाणी होणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षणावर गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून देखरेख ठेवणे त्याचे मुल्यांकन करणे . उपाय योजना सुचविणे व ते तातडीने अमलात आणण्यासाठी सर्व प्राचार्य डाएट व खालील पर्यवेक्षकीय यंत्रणे सोबत संर्पकात राहणे.
६. सदर समितीच्या वर्षातून किमान २ बैठका होणे बंधनकारक राहील.

**गुणवत्ता संवर्धन व नाविन्यपूर्ण उपक्रम हे सर्वच संचालकांच्या कामकाजाशी निगडीत असल्याने प्रत्येक संचालक कार्यालयाने, उप विभागीय कार्यालयाने, जिल्हा व तालुका स्तरावरील कार्यालयाने तसेच प्राचार्य डाएट यांनी आपल्या कार्यालयात सदर कक्षाची स्थापना करणे बंधनकारक राहील.**

या संदर्भात मा. सचिव, शालेय शिक्षण यांच्याकडे वर्षातून २ बैठका आयोजित करण्यात येतील, त्यात प्रत्येक संचालकांनी आपला अहवाल, उपाय योजना व शिफ़ारशी सादर करणे बंधनकारक राहील.

शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी जिल्हास्तरावर DIET ही प्रमुख संस्था असून SCERT ने नवोपक्रम समितीची स्थापना करणेबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत. तथापि DIET मधील शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन व नाविन्यपूर्ण उपक्रम कक्षाची पुढील प्रमाणे पुर्नरचना करण्यात येत आहे.:-

| | | |
|---|---|---|
| १ | प्राचार्य डाएट | अध्यक्ष |
| २ | गट विकास अधिकारी | सदस्य |
| २ | UCR/BRC/CRC प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | केंद्र प्रमुख प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | प्रयोगशील व उपक्रमशील नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणा-या शाळांचे मुख्याध्यापक / शिक्षक (प्रत्येकी दोन प्रतिनिधी) | सदस्य |
| ५ | अधिव्याख्याता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | सदस्य सचिव |

DIET संस्थेमधील शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन व नाविन्यपूर्ण उपक्रम कक्षाचे कार्ये व भुमिका पुढील प्रमाणे राहतील :-

जिल्हयातील शिक्षकांची नाविण्यपूर्ण उपक्रमाची माहिती घेणे, त्याची गुणवत्ता व उपयोगिता ठरविणे त्याचे तपशिलवार विवरण तयार करणे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे (उदा: ब्लॉग चालविणे, इमेल पाठविणे, डेटाबेस तयार करणे, पोर्टल तयार करणे, शिक्षकांचा सदर उपक्रमात जास्तीत जास्त सहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न करणे. सतत नाविण्यपूर्ण उपक्रमासाठी शिक्षकांना प्रोत्साहित करणे.)

१) जिल्हयात विद्यापरिषदे मार्फत मान्य प्रशिक्षणाचे वेळापत्रक नियोजित पध्दतीने राबविण्यात येत आहे किंवा कसे याबाबत अद्यावत माहिती ठेवणे, प्रशिक्षणाची गुणवत्ता राखण्यासाठी उपाय योजना करणे (उदा:चांगली बैठक व्यवस्था , आवश्यकते नुसार वाहतुकीची साधने, अल्पोपहार व जेवणाचा दर्जा योग्य ठेवणे. प्रशिक्षणाची साधन सामुग्रीची उपलब्धता तपासणी त्याचा दर्जा तपासणे, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याचा उपयोग शिक्षकांना त्यांच्या दैनंदिन शिकवण्याच्या पध्दतीत होत आहे किंवा कसे ते पाहणे. अडचणी उद्भवल्यास त्यावर उपाय योजना करणे आवश्यकते प्रमाणे विद्यापरिषद व शासनास धोरणात्मक निर्णयासाठी शिफारशी करणे.) प्रत्येक प्रशिक्षण संपल्यानंतर त्याचा मुल्याकंन अहवाल प्राचार्य डाएट यांनी संचालक, विद्या परिषद यांना सादर करावा.

२) शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक योजनांची (उदा: चावडी वाचन, अभ्यास जत्रा, शिक्षणोत्सव, शिक्षकांचे प्रशिक्षण सातत्यपूर्ण संर्वकष मूल्यमापन, शाळाबाहय बालकांसाठी विशेष प्रशिक्षण, गट/शहर साधन केंद्रांचा शैक्षणिक साहयासाठी उपयोग, ग्रंथालयाचा वापर, अध्ययन समृध्दी कार्यक्रमाअंतर्गत उपलब्ध शैक्षणिक साहित्य व कोपरे, मोफत पाठयपुस्तके, इत्यादी) गुणवत्ता नियंत्रणासह प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हयातील विभागाच्या विविध यंत्रणेशी समन्वय साधून प्रयत्न करणे.

३) प्राचार्य डाएट यांनी आपला मासिक अहवाल व शिफारशी संचालक विद्या परिषद यांनी त्यांच्या कार्यालयात स्थापन केलेल्या **"शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन व नाविण्यपूर्ण उपक्रम कक्ष "** यांना सादर करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४११२११६४१२८६८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Phansekar Reena V

Digitally signed by Phansekar Reena V
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Phansekar Reena V
Date: 2014.11.21 16:49:14 +05'30'

**( री.वि.फणसेकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे
५. आयुक्त, क्रीडा महाराष्ट्र राज्य, पुणे
६. संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे
७. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
८. संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई
९. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
१०. संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे
११. अध्यक्ष, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
१२.सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, मुंबई
१३.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१५. सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र
१६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
१७. निवड नस्ती (माशि-४)